पुण्य नगरी

# ‘अर्बन’ च्या ५० टक्के रक्कमा मिळण्याचा मार्ग मोकळा

## अवासायक गणेश गायकवाड यांची माहिती; १९२६ ठेवीदारांना मिळणार लाभ

**अहिल्यानगर :** अवसायानात निघालेल्या नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या ठेवीदारांसाठी मोठा दिलासा देणारी माहिती समोर आली आहे. पाच लाखांपेक्षा जास्त रकमेची ठेव पावती असलेल्या ठेविदारांना ठेव पावतीच्या ५० टक्के इतकी रक्कम जुलै महिन्यात मिळणार असल्याची माहिती बँकेचे अवसायक गणेश गायकवाड यांनी दिली.




याबाबत डीआयसीजीसी यांच्याकडे ना हरकत प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुसार डीआयसीजसी कार्यालयाकडून ना हरकत प्रमाणपत्र नुकतेच बँक प्रशासनास प्राप्त झाले आहे. त्यामुळे पाच लाखांपेक्षा जास्त ठेव रक्कम असलेल्या व विहित नमुन्यातील क्लेम फॉर्म व केवायसी अपडेट केलेल्या १९२६ ठेवीदारांना ठेव पावतीच्या ५० टक्के इतकी रक्कम जुलै महिन्यात मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ठेवी परत करण्याचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून दुसऱ्या टप्प्याचे आरबीआयशी निगडित कामकाज जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पूर्ण झाल्यानंतर या रकमा ठेवीदारांच्या खात्यात वर्ग करण्यात येणार आहेत.


Powered by: erelego.com